| MHKO050020532026 | <u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१०४/२०२६ मध्ये नि.क्र.१ खालील आदेश</u><br><u>अजय आण्णाप्पा कोळी विरुध्द महाराष्ट्र शासन.</u> |
| --- | --- |

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४९७ व ५०३ (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ व ४५७) अन्वये शहापूर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथील गु.र.क्र.२६४/२०२५ मध्ये जप्त केलेला मुद्देमाल परत मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार नामे अजय आण्णाप्पा कोळी, रा.विठ्ठलनगर, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथील रहिवासी असून त्यांच्या मालकीचे Renault Triber RXL Petrol MT हे वाहन ज्याचा नोंदणीकृत क्र.एमएच-०९-एफव्ही-६१२४, चेसीस क्र.MEERBC008MB116835 इंजिन नं.B4DA417E117758 वरील गुन्ह्याच्या तपासकामी जप्त केलेले असल्यामुळे अर्जदाराने सदरचा अर्ज जप्त मुद्देमाल परत मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

३. तपासी अंमलदार व सरकारी अभियोक्ता यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन जप्त मुद्देमाल परत देण्यास हरकत घेतलेली आहे.

४. अर्जदाराने नि.क्र.३ सोबत जप्त वाहनाचा फोटो, आर.सी.बुकची प्रत, अटकपुर्व जामीन आदेशाची प्रत, एफ.आय.आर.ची प्रत व नि.क्र.८ सोबत विम्याची प्रत या कागदपत्रांचे अवलोकन केले. पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल याच्यावर मालकी हक्क सिध्द करण्याकरीता अर्जदाराने स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. ***"सुंदरलाल अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य, ए.आय.आर. २००३, मा. सर्वोच्च न्यायालय ६३८"*** या प्रकरणातील मार्गदर्शक तत्वाचे अवलोकन केले असता गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल काही अटी व शर्तींवर अर्जदारास परत देणे न्यायोचीत व हिताचे असल्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. शहापूर पोलीस ठाणे, इचलकरंजी यांनी गु.र.क्र.२६४/२०२५ मध्ये जप्त केलेला अर्जदाराच्या मालकीचा Renault Triber RXL Petrol MT नोंदणीकृत क्र.एमएच-०९-एफव्ही-६१२४, चेसीस क्र. MEERBC008MB116835 इंजिन नं.B4DA417E117758 हे वाहन अर्जदार यांच्या ताब्यात देण्यात यावे.

३. अर्जदाराने सदरचा मुद्देमाल न्यायालयाच्या परवानगीशिवाय कोणालाही हस्तांतरीत करु नये किंवा त्याचे स्वरुप बदलू नये. तसेच न्यायालय आदेश करेल त्यावेळेस अर्जदाराने सदरचा मुद्देमाल न्यायालयात हजर ठेवावा. अर्जदाराने रक्कम रु.१०,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये दहा लाख) एवढ्या किंमतीचे सुपुर्तनामा बंधपत्र करुन द्यावे.

४. तपासी अंमलदार यांनी अर्जदारास सदरचा मुद्देमाल परत करतेवेळी सदरच्या मुद्देमालाचे दोन फोटोग्राप्स काढावेत सदरच्या फोटोग्राप्सचा खर्च अर्जदाराने करावा. अर्जदाराने वरील अटींची पुर्तता केल्यानंतर व अर्जदाराची ओळख पटल्यानंतर तपासी अंमलदार यांनी सदरचा जप्त मुद्देमाल अर्जदारास परत करावा.

५. सदर आदेशाची एक प्रत प्रस्तुत गुन्ह्यातील दोषारोपपत्रासोबत दाखल करावी.

REENA DEEPAK KHARATE
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2026.07.02 16:01:04 +0530

दि.०२/०७/२०२६.
ठिकाणः- इचलकरंजी.

**(आर. डी. खराटे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इचलकरंजी.